**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दि.०५/०५/२०२६**

## मा.महापौर महोदयांसह शहरातील अनेक मान्यवरांनी केली स्वगणना; सर्व नागरिकांनी स्वगणना करून जनगणनेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील स्वगणनेस दि.०१ मे २०२६ रोजी सुरुवात झाली आहे. शहरातील जनगणना उपक्रमाला गती देण्यासाठी मा.महापौर श्री.अजीव पाटील यांचे सह शहरातील अनेक मान्यवरांनी स्वतः स्वगणना करून शहरातील सर्व नागरिकांनीही स्वगणना करून जणगणनेच्या राष्ट्रीय कार्यात सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

जनगणना ही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, प्रत्येक नागरिकाने अचूक माहिती देणे आवश्यक आहे. “स्वगणना ही सोपी, सुरक्षित आणि वेळ वाचवणारी प्रक्रिया आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे,” असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

मा.महापौर महोदयांसह शहरातील विविध राजकीय, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक, व्यावसायिक इ.क्षेत्रातील तसेच विविध संस्थांशी संबंधित मान्यवरांनीही स्वगणना करून इतरांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. त्यामुळे शहरात जनगणनेबाबत सकारात्मक वातावरण तयार होत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, महानगरपालिका प्रशासनानेही नागरिकांना स्वगणना प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती सुरू केली आहे. नागरिकांनी कोणतीही चुकीची किंवा अपूर्ण माहिती न देता अचूक तपशील द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जनगणनेतून मिळणारी माहिती भविष्यातील विकास योजना, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि इतर सार्वजनिक सेवांच्या नियोजनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

शहरातील नागरिकांनी https://se.census.gov.in या पोर्टलवर जाऊन आपल्या मोबाईल क्रमांकाद्वारे लॉगीन करावे व आपली अचूक माहिती भरून मिळणारा SE ID सुरक्षित ठेवावा व जणगणनेसाठी येणाऱ्या प्रगणकास त्यावेळी द्यावा. सर्व नागरिकांनी स्वगणनेत सहभाग नोंदवावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत असून, या उपक्रमामुळे जनगणना कार्य अधिक परिणामकारक आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.